





महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,अर्धापूर
तालुका-अर्धापूर,जिल्हा- नांदेड

वेबसाईट- www.maharashtra.gov.in **www.mahapwd.com**	**सार्वजनिक बांधकाम उपविभाग,अर्धापूर** **तालुका-अर्धापूर,जिल्हा- नांदेड**
जा.क्र./525/~~2026~~	दिनांक: 04/09/2026

प्रति,

मा. कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

विषय:- शांतीनिकेतन पब्लीक स्कूल मालेगाव ता. अर्धापूर या शाळेचे "इमारत सुरक्षा प्रमाणपत्र" मिळणे बाबत.

संदर्भ:- 1. आपले कार्यालयीन पत्र जा.क्र./आ./नां ४५१४, दि. ०१/०९/२०२६
2. प्राचार्य, शांतीनिकेतन पब्लीक स्कूल मालेगाव ता. अर्धापूर यांचे पत्र जा.क्र. O.W.NO. १३४/२०२५-२६, दि.१२/०६/२०२६

उपरोक्त विषय व संदर्भीय बाबीस अनुसरून, शांतीनिकेतन पब्लीक स्कूल मालेगाव ता. अर्धापूर विद्यालयाच्या इमारतीची दिनांक ०३/०९/२०२६ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली.

सदर पाहणीच्या वेळी इमारतीच्या उपलब्ध अभिलेखांची तसेच प्रत्यक्ष बांधकामाची पाहणी करण्यात आली. त्यामध्ये इमारतीच्या प्रमुख संरचनात्मक घटकांची, जसे की पाया/प्लिंथ, कॉलम, बीम, स्लॅब, विटांचे बांधकाम, छत, जिने, पॅरापेट, दरवाजे-खिडक्या इत्यादींची दृश्य तपासणी करण्यात आली. इमारत सध्या समाधानकारक स्थितीत असून शैक्षणिक वापरासाठी सुरक्षित व वापरण्यायोग्य असल्याचे आढळून आले.

तसेच इमारतीतील उपलब्ध प्रवेशमार्ग, जिने, निर्गमन मार्ग, पॅरापेट/रेलिंग व इतर आवश्यक सुरक्षितता बाबींची पाहणी करण्यात आली असून सद्यस्थितीत त्या समाधानकारक असल्याचे आढळून आले.

वरीलप्रमाणे केलेल्या स्थळ पाहणीच्या आधारे सदर शाळेची इमारत सद्यस्थितीत सुरक्षित व वापरण्यायोग्य असल्याचे निदर्शनास आले आहे. करिता सदर इमारतीसाठी इमारत सुरक्षा प्रमाणपत्र सोबत सादर करण्यात येत आहे.

करिता माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

उपविभागीय अभियंता
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,अर्धापूर

सोबत: इमारत सुरक्षा प्रमाणपत्र

ग.अ.
.अ.
क्र. 1805
04 SEP 2026